दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, शुक्रवार, दि.०४ ऑक्टोबर २०२४
वर्ष : ०४, अंक : ५१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## आजचा रंग हिरवा



नवरात्रातील दुर्गा मातेच्या दुसऱ्या रूपाचे नाव ब्रह्मचारिणी असे आहे. ब्रह्म म्हणजे तपस्या. व ब्रह्मचारिणी म्हणजे तपाचे आचरण करणारी, त्यावरूनच तिचे दुसरे नाव तपश्चारिणी असेही पडले. भगवान शंकरांना पती म्हणून मिळवण्यासाठी तिने एक हजार वर्षे ऊन व पाऊस खाऊन कठोर तपस्या केली. तसेच शंभर वर्षे केवळ सुकलेली बेलाची पाने खाऊन तपश्चर्या केली, त्यामुळेच तिचे नाव अपर्णा असे देखील आहे. पूर्वजन्मी ती हिमालयाची कन्या म्हणूनच जन्माला आली होती. ब्रह्मचारिणी देवीचे रूप भक्तांना अनंत फळ प्रदान करते. या देवीच्या उपासनेने तप, भाग्य, वैराग्य, सदाचार यामध्ये वृद्धी होते. तिच्या उजव्या हातात जपमाळ आहे तथा डाव्या हातात कमंडलु आहे. अशाप्रकारे कठीण प्रसंगांना सामोरे गेलेल्या ब्रह्मचारिणी देवीच्या भक्तीने मानवाला विजय प्राप्त होतो.

## घटस्थापनेने श्री तुळजाभवानी देवीच्या नवरात्र महोत्सवास प्रारंभ !

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०३, धाराशिव :** महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास तुळजापूर येथे आज गुरूवार आश्विन शुक्ल प्रतिपदा आई तुळजाभवानीची अलंकार महापूजा व घटस्थापनेचा धार्मिक वातावरणात प्रारंभ झाला.श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे पारंपारीक पध्दतीने श्री तुळजाभवानी देवीजींची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली.त्यानंतर दुपारी १२ वाजता श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते आज ३ ऑक्टोबर रोजी विधिवत घटस्थापना करण्यात आली. मंत्रोच्चाराने,आई राजा उदो-उदोचा जयघोष आणि पारंपारिक वाद्य संबळाच्या साथीने सर्व पुजाविधी करण्यात आले.

घटकलशाची पारंपरिक पध्दतीने पूजा करून घटकलशांची घटस्थापना देवीजींच्या गाभाऱ्यात करण्यात आली.तसेच खंडोबा मंदिर,यमाईदेवी मंदिर,टोळभैरव आणि आदिमाया आदिशक्ति या मंदिरामध्ये जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली.



मंदिर व्यवस्थापन आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.भाविकांनी दर्शन मंडप सुविधेचा लाभ घ्यावा.शिस्तबध्द पध्दतीने व धार्मिक वातावरण कायम राखून दर्शन घ्यावे.तसेच कुठल्याही प्रकारची अडचण असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशन अथवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अनेक भाविक वेगवेगळ्या भागातून पायी चालत तुळजापूर येथे येतात त्यांनी वाहतूक मार्गावरुन चालतांना काळजी घ्यावी, असे आवाहन ही जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी घटस्थापनेनंतर केले. त्यांनी सर्व भाविकांना शारदीय नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा यावेळी दिल्या.

प्रतिवर्षाप्रमाणे या उत्सवासाठी महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यातूनही मोठ्या प्रमाणात भाविक तुळजापूर नगरीत दाखल झाले आहेत.आज हजारो भाविकांनी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. वेगवेगळ्या गावातूनही युवक भवानी ज्योत घेवून जाण्यासाठी तुळजापूरकडे चालत येतानाचे चित्र दिसत होते.

नवरात्र महोत्सवानिमित्त मंदिर संस्थान, पोलीस प्रशासन, नगरपालीका, तहसील कार्यालय यांच्यासह आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, एस.टी.महामंडळ आदि विभागांनीही भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. भाविकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा आणि गैरसोय टाळावी,असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी मंदिरातील धार्मिक कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्यासह श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील, महंत तुकोजी बुवा, महंत हमरुजी, वाकोजी बुवा, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, पाळीकर पुजारी मंडळ, उपाध्ये मंडळ, भोपे पुजारी मंडळ, पदाधिकारी, सहायक व्यवस्थापक सिद्धेश्वर इंतुले, अमोल भोसले, विश्वास कदम, उपस्थित होते. याशिवाय भोपे, पुजारी आराधी, गोंधळी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्योत आणायला गेलेल्या भाविकांच्या पिकअपचा अपघात दोघे ठार, सहा गंभीर जखमी

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०३, पंढरपूर :** नवरात्रोत्सवानिमित्त तुळजापूर येथून ज्योत आणण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या पिकअप गाडीचा सोलापूर-मंगळवेढा राष्ट्रीय महामार्गावर अपघात झाला. गाडी पलटी होऊन झालेल्या या दुर्घटनेत दोन भाविकांचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. गुरुवारी सकाळी पावणेसातच्या सुमारास मोहोळ तालुक्यातील कामती गावाजवळ हा अपघात घडला.

मृतांमध्ये प्रदीप सुरेश क्षीरसागर (वय २०) आणि नेताजी अंकुश कराळे (वय २३), दोघेही गोणेवाडी (ता. मंगळवेढा, जिल्हा सोलापूर) येथील रहिवासी होते. या अपघातामुळे गावावर शोककळा पसरली आहे. कामती पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोणेवाडीतील काही भाविक तुळजापूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त ज्योत आणण्यासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात सोलापूर-मंगळवेढा महामार्गावर कामती खुर्द गावाजवळ पिकअप गाडी कठड्यावरून पलटी झाली आणि सिमेंटच्या गटारीत पडली. या अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला, तर रोहित अशोक माने (वय १४), रोहित दिलीप कसबे (वय २०), समाधान मोहन मासाळ (वय २९), सोहेल राजू मुलानी (वय ३२), महेश भारत बंडगर (वय १७), वैभव अर्जुन हजारे (वय २४) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## राज्याच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या लढवय्या बंजारा समाजाला न्याय देऊ



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०३, किनवट (नांदेड) :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या टिळक भवन कार्यालयामध्ये प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत व ओबीसी विभागाचे भानुदास माळी यांच्या अध्यक्षतेखाली व ओबीसी प्रदेश सरचिटणीस धनराज राठोड यांच्या नेतृत्वात बंजारा समाजाच्या प्रमुख प्रतिनिधीसोबत बैठकी पार पडली. या बैठकीत बंजारा समाजाच्या समस्या मांडण्यात आल्या क्रिमिलियरची अट रद्द करणे, तांड्यांना महसूली दर्जा, तांडा विकास धोरण, वसंतराव नाईक सोशल डेव्हलपमेंट सेंटर, तांड्यातील युवकांचे व युवतींचे शैक्षणिक, सामाजिक प्रश्न आणि बंजारा समाजाला न्याय देणाऱ्या सर्व मागण्या जाहीरनाम्यात समाविष्ट करण्याची प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ग्वाही दिली.या दरम्यान बंजारा समाजाला योग्य प्रतिनिधीत्व किनवट-माहूर विधानसभेकरिता धनराज राठोड यांच्या रुपाने द्यावी मागणी झाली त्यावेळी नाना पटोले यांनी स्व. वसंतराव नाईक व स्व. सुधाकरराव नाईक यांनी या राज्याचे नेतृत्व केले, बंजारा समाज हा लढवय्या आहे.यावेळेस या बंजारा समाजाला योग्य प्रतिनिधीत्व देण्यात येईल असेही ग्वाही दिली.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष आ. वजाहत मिर्जा, महाराष्ट्र महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सेल विभागाच्या संयोजिका प्रज्ञा वाघमारे, सरचिटणीस नंदकुमार कुंभार, सचिव डॉ. श्रावण रॅपनवार डॉ. टी. सी. राठोड, प्रदेश प्रवक्ते मदन जाधव, मोहन राठोड, शुभांगी शेरेकर, यादवराव जाधव, भागोराव राठोड, बंडू महाराज, डॉ.व्यंकटेश राठोड, डॉ. चेतन राठोड, राजेश चव्हाण, गोविंद बंजारा टीव्ही, संदिप चव्हाण, सतीश राठोड, प्रदीप राठोड, अर्चना राठोड, निलेश राठोड, योगिता पवार, प्रकाश जाधव, दयाराम पवार, रितेश पवार, संजय पवार आदी मोठ्या प्रमाणात प्रतिनिधी उपस्थित होते.

## रोहित शर्माची कर्जत जामखेड येथे मराठीतून फटकेबाजी
### पुढचे जैस्वाल-बुमराह नगरमधून येतील...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहमदनगर :** टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा याने कर्जत जामखेडच्या राशीन येथे एका क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन केले. आमदार रोहित पवार यांच्या मतदारसंघात या स्टेडियमची निर्मिती करण्यात आली आहे. टीम इंडियाचा कर्णधार हिटमॅन रोहित शर्मा गुरुवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी कर्जत जामखेड येथे पोहोचला होता. रोहित शर्माने येथे एका क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन केले.

वास्तविक, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या मतदारसंघात हे भव्य स्टेडियम बांधण्यात आले आहे. रोहित शर्मा याच्या हस्ते या स्टेडिअमचे उद्घाटन झाले. कर्जत तालुक्यातील राशीन येथे सकाळी रोहित शर्मा पोहोचला, त्यानंतर त्याचे भव्य पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी रोहित शर्माने मराठीतून भाषण केले. रोहितला पाहण्यासाठी प्रचंड गर्दी जमली होती. बोलताना रोहितने पुढचे यशस्वी जैस्वाल आणि जसप्रीत बुमराह याच ठिकाणहून येतील असे म्हटले, तेव्हा जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. रोहित शर्मा म्हणाला की, राशीनमध्ये येऊन मला खूप आनंद झाला.



गेल्या ३ महिन्यांत आपल्या आयुष्यात बरेच काही घडले आहे. आमचे लक्ष्य टी-२० विश्वचषक जिंकण्याचे होते. विश्वचषक जिंकल्यानंतर माझ्या आयुष्यात पुन्हा जिवंतपणा आला. क्रिकेट हा सगळ्यांनाच आवडणारा खेळ आहे. आपण राशीनमध्ये क्रिकेट अकादमी सुरू करत आहोत आणि मला खात्री आहे की पुढील यशस्वी जैस्वाल, जसप्रीत बुमराह हे येथूनच मिळतील. दरम्यान, या वेळी आमदार रोहित पवार यांनी रोहित शर्माला काही प्रश्न विचारले, त्याची उत्तरेही रोहित शर्माने त्याच्या स्टाईलमध्ये दिली.

राशीनमध्ये श्री माता अंबाबाईचे मंदिर आहे. या मंदिराला भेट देऊन आणि ग्रामीण भाग पाहून तुम्हाला कसे वाटले? असे विचारले असता. रोहित म्हणाला, मला खूप फ्रेश वाटत आहे. गाडीतून येथे येताना इथला ग्रामीण भाग पाहून आनंद झाला. या क्रिकेट अकादमीच्या माध्यमातून मी पुन्हा इथे येण्याचा प्रयत्न करेन.

## मुलींची छेडछाड, एक कॉल...प्रॉब्लेम सॉल्व्ह... अजितदादा ॲक्शन मोडमध्ये

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०३, बारामती (पुणे) :** बारामती शहरात टीसी कॉलेज येथील घडलेल्या खळबळजनक घटनानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार 'ॲक्शन मोड' मध्ये आले आहेत. आजित पवार यांनी गुरुवारी पहाटे ६ वाजता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेत महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थीनी, महिलांच्या प्रभावी सुरक्षिततेसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत पंचशक्ती अभियान सुरु केले आहे. या अभियानामध्ये शक्ती बॉक्स,शक्ती कक्ष, शक्ती नंबर, शक्ती नजर,शक्ती भेट या उपक्रमांचा समावेश आहे. शाळा महाविद्यालय,शासकीय कार्यालयांसह सर्वत्र सार्वजनिक ठीकाणी हे उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

याबाबत पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले की, शहरात पंचशक्ती अभियान सुरु करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.यात महिलांचा सन्मान, पालकांची सुरक्षा आणि युवकांचे प्रबोधन या अभियान केलं जाणार आहे.या अभियानात पंचशक्ती आहे.शक्ती बॉक्स ही एक तक्रारपेटी शाळा महाविद्यालय, शासकीय कार्यालयांसह अनेक महिला तथा मुलींना अडचणींबाबत म्हणजे मुलांकडून होणारा पाठलाग, छेडछाड, निनावी कॉल सारखे काही प्रकार चालतात, याबाबत पीडित महिला किंवा मुलींना मनमोकळेपणाने त्यांना ही गोष्ट सांगता येत नाही.अशा पीडितांना आपलं म्हणणं किंवा आपली तक्रार या पेटीद्वारे मांडता येणार आहे.गुन्हेगारीच्या अनुषंगाने काही संशयास्पद वस्तू आढळल्यास, तसेच अवैध गांजा, गुटखा यासारखा साठा सापडल्यास याबाबतची गोपनीय माहिती तक्रारपेटीत टाकल्यानंतर पोलिसांमार्फत सदरची पेटी उघडून त्यामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधितांचं नाव देखील अतिशय गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

एक शक्तीनंबर देखील तयार केला आहे. एक कॉल, प्रॉब्लेम सॉल्व्ह असं स्लोगन त्याला दिलंय.तो नंबर '९२०९३९४९१७' या क्रमांकाची सेवा सातही दिवस २४ तास सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या नंबरवर फोन किंवा मेसेज करुन तक्रार केल्यास त्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येणार आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,प्रत्येक पोलीस स्टेशनला शक्ती कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. यामध्ये दोन महिला पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे.मुली,बालके यांना भयमुक्त वातावरण निर्माण करणे,त्यांना विश्वासात घेऊन समस्यांचे निराकरण करणे, कायदे विषयक मार्गदर्शन करण्यात येइल.याशिवाय शक्ती नजर उपक्रमाअंतर्गत सोशल मिडीयावर पोलीसांची नजर राहणार आहे. यामध्ये शस्त्र, बंदुक, धारदार हत्यारांचे फोटो ठेवणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात येइल.तसेच शक्ती भेट अंतर्गत शाळा महाविद्यालयांना भेटी देण्यात येत आहेत. शाळा, कॉलेज, सर्व सरकारी कार्यालय, कंपन्या हॉस्पिटल, बस स्टँड, कोचिंग क्लास, महिला वसतीगृह आदी सार्वजनिक ठिकाणी भेटी देऊन कायदेशीर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याशिवाय व्यसनाधीनता, बाल गुन्हेगारी बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.त्यांच्याशी सुसंवाद साधून लैंगिक, शारीरिक मानसिक छळापासून संरक्षण करून याबाबत जागरूकता निर्माण करणे, या भेटीचा उद्देश असणार आहे.

## थायलंडच्या फुलांची जगदंबेच्या चरणी सेवा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, धाराशिव :** खास थायलंडहुन मागविण्यात आलेल्या 'व्हाईट ऑर्चिड', 'ॲन्थुरियम' फुलांनी नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी तुळजाभवानी मंदिराचा गाभारा आणि परिसर गंधाळून निघाला आहे. एक टन फुलांच्या आकर्षक सजावटीमुळे जगन्माता जगदंबेचा दरबार फुलून आला आहे. ३० कलाकारांनी सलग तीन दिवस काम करून तुळजाभवानी देवीचे महाद्वार, सिंहगाभारा, जिजाऊ महाद्वार आणि उपदेवतांची मंदिरे आकर्षक पध्दतीने सजवली आहेत. महाद्वारासमोरल फुलात साकारलेला गरुड मारुती रथ भाविकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनला आहे.

मागील १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथील ज्ञानेश्वर पाचुंदकर सेवा म्हणून तुळजाभवानी देवीच्या चरणी फुलांची आरास सादर करतात. तुळजाभवानी मंदिराप्रमाणेच विठ्ठल-रूक्मिणी मंदिर पंढरपूर, आळंदीचे संत ज्ञानेश्वर मंदिर, जेजुरीचा खंडोबा, कोल्हापुरची अंबाबाई आणि रांजणगावच्या महागणपतीलाही दरवर्षी पाचुंदकर परिवाराकडून फुलांची आरास केली जाते. तुळजाभवानी देवी मंदिरात फुलांची सजावट करण्याचे त्यांचे हे तेरावे वर्ष आहे.

## संपादकीय



### डान्सिंग स्टार

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा कला क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या अभिनय कलेचा गौरव आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी जवळपास पाच दशके चित्रपट सृष्टीत व्यतीत केले असून हिंदी, बंगाली सह अनेक भाषेत अभिनय केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत डान्सिंग स्टार म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म १६ जून १९५० रोजी झाला. बी एस सी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटमध्ये प्रवेश घेतला. अभिनयाचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी मृगया या बंगाली चित्रपटात अभिनय केला. मृगया या त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे देशभर नाव झाले. त्यांनीही मग हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबई गाठली मात्र इथे त्यांना सहजासहजी चित्रपट मिळाले नाही. त्यांनाही चित्रपटात भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९८२ साली आलेल्या डिस्को डान्सर हा त्यांचा तसा गाजलेला पहिला हिंदी चित्रपट. या चित्रपटाने त्यांना डान्सिंग स्टार बनवले पुढे हीच ओळख त्यांची कायम राहिली. त्यांनीही ही ओळख जपण्याचा प्रयत्न करत अनेक चित्रपटात अप्रतिम नृत्यकला सादर केली. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट हिट होत गेले. विशेषतः ८० च्या दशकात त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. सुरक्षा, तराणा, हम पांच, शौकीन, वारदात, डिस्को डान्सर, प्यार झुकता नही, डान्स डान्स असे त्यांचे अनेक चित्रपट हिट झाले. तो काळ सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेले अनेक चित्रपट त्यांना मिळाले आणि त्यांनी त्यांचे सोने केले. त्यांच्याकडे चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्यांची रांग लागू लागली म्हणूनच त्यांना गरीब दिग्दर्शकांचा अमिताभ असे म्हंटले जाऊ लागले. १९९० साली त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतच अग्निपथ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे ही त्यांनी सोने केले. अमिताभ बच्चन यांच्यासमोर त्यांनी सशक्त अभिनय करून वाहवा मिळवली. ९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या भूमिका केल्या मात्र ९० च्या उत्तरार्धात त्यांनी मिळेल त्या भूमिका स्वीकारल्या त्यामुळे त्यांचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले. समीक्षकांनी त्यांना धारेवर धरले पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उतार वयात मात्र ते चरित्र भूमिकांकडे वळले. वीर, गोलमाल ३, हाऊसफुल्ल २, ओह माय गॉड, खिलाडी ७८६, कांची, किक अशा चित्रपटातून त्यांनी चरित्र भूमिका साकारल्या. या भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. छोट्या पडद्यावरील डान्स इंडिया डान्स या नृत्यावर आधारित कार्यक्रमात त्यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांना तीन राष्ट्रीय, दोन फिल्मफअर, दोन स्टार डस्ट व एक स्क्रीन अवॉर्ड मिळाला. आता त्यांना दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव झाला असे म्हणावे लागेल. अर्थात त्यांना मिळालेल्या या पुरस्कारावरही काहींनी आक्षेप घेतला आहे. मिथुन चक्रवर्ती हे सत्ताधारी पक्षाचे समर्थक असल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेला असा आक्षेप घेतला जात आहे. अर्थात आक्षेप घेणारेही त्यांच्या अभिनय कलेचे प्रशंसक आहेत हे देखील तितकेच खरे आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचे मनापासून अभिनंदन!

## आ.भास्कर जाधव यांच्या उपस्थितीत कोकणवासीय पुणे रहिवासी ग्रामस्थांचा मेळावा संपन्न




**अक्षराज : योगेश जाधव**

**दि.०३, पुणे :** कोकणवासीय गुहागर विधानसभा क्षेत्र मतदारसंघातील पुणे रहिवाशांचा मेळावा आमदार भास्कर जाधव, यांच्या उपस्थितीत पुण्यातील चांदणी लॉन्स येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याला गुहागर,खेड आणि चिपळूण तालुक्यातील हजारोंच्या संख्येने पुणेकर उपस्थित होते.

त्यावेळी बोलताना भास्कर जाधव म्हणाले, कोरोनाच्या काळात लोकांना औषधे, धान्य पुरविण्यापासून मुंबई-पुण्याच्या चाकरमान्यांना गावात घेतलं पाहिजे यासाठी प्रबोधन करण्यापर्यंतचे काम आम्ही केले. वेगवेगळ्या चक्रिवादळांच्या काळात नुकसानग्रस्तांना सर्वतोपरी मदत करण्याचे काम आम्ही केले.

त्यावेळी सध्या साडीवाटप करणारी भाजपची मंडळी घरात बसलेली होती, अशी घणाघाती टीका आमदार जाधव यांनी केली. याच भाजपच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या अडीच वर्षात विकासकामांना रूपयाचा दिला नाही, उलट आधीचे मुख्यमंत्री उध्दवसाहेब ठाकरे यांनी मंजूर केलेल्या विकासकामांवर स्थगिती आणली. आपण उच्च न्यायालयात संघर्ष करून ही स्थगिती उठवली, असे सांगताना त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचा केवळ गवगवा आहे. राज्यात ६ कोटी ५३ लाख महिलांपैकी केवळ १ कोटी १३ लाख महिलांनाच या योजनेचा लाभ मिळाला आहे. उर्वरित ५ कोटी ४० लाख महिला या योजनेपासून वंचित आहेत, हे वास्तव माननीय आमदार भास्कर जाधव यांनी समोर आणले.

या मेळाव्यात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विक्रांत जाधव यांनी आपल्या भाषणाने सर्वांचे मन जिंकले. विक्रांतचे भाषण ऐकून आपण मंत्रमुग्ध झालो, असे उद्गार मेळाव्याला उपस्थित माजी मंत्री शशिकांत सुतार यांनी काढले.

आमदार श्री. जाधव यांनी मंत्रिपदाच्या काळात केलेले प्रचंड काम, विविध योजनांच्या माध्यमातून गरजूंना मिळवून दिलेला लाभ, संकटकाळात धावून जावून केलेली मदत याची आठवण करून देत विक्रांत जाधव यांनी १६ फेब्रुवारी २००२ रोजी शृंगारतळी येथील सभेत आमच्या कुटुंबावर झालेली अश्लील भाषेतील शिविगाळ तुम्हाला मान्य आहे का, असा सवाल उपस्थितांना केला. याचं उत्तर मतदानाच्या माध्यमातून तुम्हाला दयावं लागेल, असे सांगताना ते म्हणाले, आमदार जाधव साहेब हे जरूर आक्रमक आहेत. पण ते कधीही कुणाच्या मुलींविषयी, महिलांविषयी बोलत नाहीत आणि त्यांच्यावर गेल्या ३५ वर्षात भ्रष्टाचाराचा एकही डाग नाही. शिवसेनेचे शहरप्रमुख गजानन थरपुडे, महानगरपालिकेतील माजी गटनेते पृथ्वीराज सुतार, गुहागर संपर्क प्रमुख प्रकाश महाडिक, निवृत्त जिल्हाधिकारी मधुसु साळवी, महिला संघटिका सविताताई मते,

महानगरपालिकेतील माजी गटनेते पृथ्वीराज सुतार, गुहागर संपर्क प्रमुख प्रकाश महाडिक, वैभव वाघ, जत तालुका संपर्कप्रमुख प्रेरणा तटकरे, गुहागरचे तालुकाप्रमुख सचिन बाईत, माजी सभापती विभावरी मुळे, तालुका सचिव महेश गोवळकर, नुरभाई दळवी आदी यावेळी व्यासपिठावर होते. विनायक मुळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा मेळावा यशस्वी केला.

## शिरवळ परिसरातील कंपनीची ८० ते ९० लाखांची फसवणूक




**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.०३, खंडाळा :** खंडाळा तालुक्यातील शिरवळ-नायगाव रस्त्यावरील सांगवी गावच्या हद्दीतील एका कंपनीचा कास्टिंग माल वेळेत परत न करता सुमारे ८० ते ९० लाखांचे फसवणूक केल्याप्रकरणी सिमरन इंजिनिअरिंग चे मालक सर्फराज मुक्तार मुल्ला (रा.अमरलक्ष्मी चौक कोडोली सातारा) त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. या बाबतची पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी खंडाळा तालुक्यातील सांगवी या गावात परांजपे ऑटो कास्ट कंपनीमध्ये दुचाकीचे कास्टिंग साहित्य तयार केले जाते. तयार केलेल्या कास्टिंगचे वेल्डिंग,फेटलिंग, रिवर्क व निरीक्षण करण्यासाठी दोन कॉन्ट्रॅक्टर नेमण्यात आले. यामध्ये सर्फराज मुल्ला यांचे सिमरन इंजिनिअरिंग फेटलिंग शॉपच्या शिरवळ येथील दि.१ सप्टेंबर २०२४ ते २३ सप्टेंबर २४ या कालावधीत कंपनी मार्फत २० मॉडेलचा २१,९६१ इतक्या मालाचा पुरवठा करण्यात आला. सिमरन इंजिनिअरिंग फेटलिंग तक्रारी आल्यामुळे उत्पादन अधिकारी सचिन बल्लाळ, सचिन कुलकर्णी, दीपक यादव व इतर यांनी दिलेल्या भेटी दरम्यान २१,९६१ कास्टिंगच्या मला पैकी १७,८८० एवढा माल कमी असल्याचे निदर्शनास आले सरफराज मुल्ला यांना याबाबतचा खुलासा कंपनीने विचारला असता संबधितानी विसंगत उत्तर दिले. त्यामुळे उत्पादन अधिकारी यांनी शिरवळ पोलीस ठाण्यात सर्फराज मुल्ला यांच्यावर ८० ते ९० लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सतीश आंदेलवार हे करीत आहे.

## पाटणमध्ये दुर्गा मातेचे उत्साहात प्रतिष्ठापना



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०३, पाटण :** दुर्गा माता की जय, आंबे माता की जयच्या घोषणा देत फटाक्याची आतषबाजी करत ढोल ताशाच्या गजरात भक्तिमय वातावरणात वाजत गाजत दुर्गा मातेचे आगमन झाले. तर गुरुवारी सकाळपासून पावसाने उघडीप दिल्याने दुर्गामाता प्रतिष्ठापना करण्यासाठी नेताना दुर्गामाता भक्तांचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसत होता. पाटण शहरासह तालुक्यातील विविध दुर्गा उत्सव मंडळांनी गुरुवारी घटस्थापनेदिवशी दुर्गामातेच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून नवरात्र उत्सवास सुरूवात केली. पाटण शहराची ग्रामदेवता श्री लक्ष्मी आई देवीची सकाळी ७ वाजता विधिवत पूजाअर्चा करून प्रतिष्ठापना करण्यात आली.

त्यामुळे दिवसभर मंदिरात देवीच्या दर्शन घेण्यासाठी भाविकांनी कर्दी केली होती. तर गुरुवार सकाळपासूनच खेडोपाड्यातील विविध मंडळाचे कार्यकर्ते ढोल, ताशे, लेझीम, फटाक्याची आतषबाजी करत व पारंपारिक वाद्याने दुर्गा मातेची मूर्ती नेण्यासाठी पाटण शहरातील कुंभारवाड्यात दाखल झाले होते. अगदी लहान चिमुकल्यांपासून ते अबाल वृध्द, महिला, युवक, युवती दुर्गामातेची मूर्ती नेण्यासाठी शहरात दाखल झाले होते. येथील स्वामी मंदिरातील शिवाजी उदय मंडळ पाटण समाज सेवा मंडळ प्रताप सेवा मंडळ जयभवानी नवरात्र उत्सव मंडळ, अष्टगंध सेवा मंडळ, शिवलिंग गणेश मंडळ, कुंभारवाड्यातील गजानन सेवा मंडळ, नवी पेठ येथील रणजीत सेवा मंडळ, चाफोली रोड येथील जयभारत, मंडळ श्रीराम मंडळ रामापूर, आदी मंडळांनी आनंदात उत्साहपूर्ण वातावरणात दुर्गा मातेच्या मुर्तींची विधिवत प्रतिष्ठापना केली.

### द्वितीय माळ..

ब्रह्मचारिणी म्हणेतुले
तू केले ब्रह्म आचरण
कठीण घोर तपश्चर्या
तपश्चारिणीनामकरण

ज्योतिर्मय न् तेजःपुंज
गं प्रकाश तुला शरण
रुप साध्वी अलौकिक
फिटले नयनांचे पारण

दृष्टी ना हटे अन्य कुठे
कमलासमान ते चरण
कृपा करिशी साधका
शुद्धज्यांचे ते आचरण

दधाना करपद्माभ्याम्
जपाने करी आळवण
मिलितोपचार द्रव्यांने
करे कशीही बोळपण

मोगराचमेली जाईजुई
शुभ्र पुष्पे प्रिय अर्पण
तपा समान भक्ती हवी
जीवन अवघे समर्पण

या देवी सर्वभूतेषु जप
अखंडीत मंत्रोच्चारण
गरबा दांडिया खेळता
मनामनात हो जागरण

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## संपूर्ण राज्यभर पर्यावरण मंडळाच्या शाखा उभारणार- प्रमोद मोरे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, अकोले (अ.नगर) :** महाराष्ट्राचे काश्मीर समजल्या जाणाऱ्या अकोले तालुक्यातील अबीतखिंड येथे सह्याद्रीच्या कुशीत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली, मुंबई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्रीच्या डोंगर रांगेत अबीतखिंड येथे जिल्हास्तरीय पर्यावरण स्नेही मेळावा व गुणवंत विद्यार्थी, शेतकरी गुणगौरव सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी जिल्ह्यातील अनेक पर्यावरण स्नेही यांनी ५०० झाडांचे वृक्षारोपण करून तेथे ट्री गार्ड लावून लोकार्पण केले.

तसेच निसर्गाची जपणूक फक्त डोंगराळ आदिवासी भागातील लोकच करू शकतात त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी भव्य रॅलीचे देखील आयोजन करण्यात आले. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महाराष्ट्रातील पहिल्या शाखेचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, सचिव वनश्री मोरे-गुणवरे, राज्य प्रसिद्धीप्रमुख महेश पाडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रभर पर्यावरण मंडळाची स्थापना करून पर्यावरण जनजागृती करणार असे प्रतिपादन अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी केले. यावेळी आदिवासी सेवा संघाच्या वतीने सह्याद्री भूषण पुरस्कार देखील सचिव वनश्री मोरे-गुणवरे, रामेश्वर चेमटे, राजश्री आहेर, बाळासाहेब ढोले, राम वाकचौरे यांना देऊन सत्कार करण्यात आला.

आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थी व शेतकरी यांचा देखील सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमोद मोरे, रामनाथ भोजने, चंद्रकांत भोजने, महेश पाडेकर, अनिल लोखंडे, विजय बोडके, छाया रजपूत, तुकाराम अडसूळ, प्रवीण गुणवरे,प्रकाश केदारी, सुनील घुले, संजय कारखिले, सुधाकर शेटे, सखाराम मेसे, कोंडीराम नेहे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अध्यक्ष रामनाथ भोजने, सरपंच यमुनाताई घनकुटे, मुख्याध्यापक राजेंद्र उकिरडे, दशरथ फापाळे, गोविंद घनकुटे, भानुदास घनकुटे, विजय गोडे, मुरलीधर गोडे, दीपक राऊत, आदींनी परिश्रम घेतले.

## खा. लंके यांचे मुख्य कार्यकारी अधिकार्यांना पत्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अ.नगर) :** साईबाबा संस्थानमध्ये सलग १० वर्षे सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचार्यांना संस्थानच्या सेवेत सामावून घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांकडे केली आहे. तसे पत्र त्यांनी दिले आहे. या पत्रात खा.लंके यांनी नमुद केले आहे की, संस्थानमध्ये १० वर्षे सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचार्यांना संस्थान सेवेत कायम करण्याबाबत छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने आदेश दिलेला आहे.

तसेच तदर्थ समितीने २ ऑगस्ट २०१४ च्या मान्यतेनुसार सादर करण्यात आलेल्या शिर्डी संस्थानच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसे पत्र ही विधी व न्याय विभागाने संस्थानकडे पाठविलेले आहे.

परंतु १० वर्षे सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचार्यांना सेवेत अद्याप कायम करण्यात आलेले नाही. संस्थानने न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच विधी व न्याय विभागाच्या पत्रानुसार कंत्राटी कर्मचार्यांना सेवेत कायम करावे, अशी मागणी खा.लंके यांनी या पत्राद्वारे केली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज

३ | बुलडाणा, शुक्रवार, दि.०४ ऑक्टोबर २०२४ | संमिश्र


## थोडक्यात

## किड्स लर्निंग स्कूल येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी

**अक्षराज : दिपक शिवले**




**दि.०२, कळवण :** किड्स लर्निंग स्कूल, टी एन रौंदळ व श्री सिद्धिविनायक स्कूल भेंडी येथे महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन कथेवर नाटिका व नृत्य सादर केले. मोठ्या जयघोषात जय जवान जय किसान या घोषवाक्याचा गजर करण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनशैलीवर भाषणे केली व कविता सादर केल्या याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुचिता रौंदळ, प्राचार्य मंगेश पगार, मुख्याध्यापिका मनिषा वाघ, मुख्याध्यापिका कांचन पगार, दर्शना पाटील, कविता पवार, संगीता नावरकर, कांचन देवघरे, भाग्यश्री वेशी, वैशाली मोरे, जयश्री आहेर, माधुरी रौंदळ, सुरेखा ठाकरे, रोहिणी महाले, तेजस्विनी पगार, विद्या रौंदळ, सोनाली सैंद, वैशाली चाटे, दिपाली कड, गायत्री भागवत, स्वाती सूर्यवंशी, सोनल वाघ, भावना पाटील, रूपाली मोरे, धनश्री वाणी, हर्षदा पवार, नेहा शेवाळे, प्रा. मोनाली ठाकरे, प्रा. गायत्री सूर्यवंशी, प्रा. सचिन पवार, प्रा. निखिल रौंदळ, कविता मावशी, पाटोळे मावशी, निशा मावशी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्योती बांगर व वैशाली मोरे यांनी परिश्रम घेतले.

## कळंब तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**




**दि.०२, कळंब (धाराशिव) :** कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने एम.पी.एस.सी परीक्षेत पहिल्या शंभर मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार शिवाजी (आप्पा) कापसे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कळंब यांच्या हस्ते करण्यात आला. यात डॉ.महेश अरविंद घाटुळे राज्यात प्रथम येऊन कळंब तालुक्याचे नाव राज्यात गौरविले. अशोक संजय बाराखोते राज्यात अकरावा, प्रशांत बापूराव इंगोले राज्यात ८२वा तसेच डॉ.रोहित चंद्रकांत पवार राज्यात ८४ वा आला. या सर्व गुणवंतांचा सत्कार शिवाजी (आप्पा) कापसे यांचे हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुछ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमात हरिभाऊ कुंभार संचालक, रोहन पारेख, मुस्ताक कुरेशी, सतीश टोणगे, डी.ओ पवार तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजाभाऊ चोरघडे यांनी केले व आभार प्रा.अमोल शिंगटे यांनी मानले.

## महात्मा गांधी जयंतीचे निमित्त बोधडी बु. येथे स्वच्छता मोहीम



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०२, किनवट (नांदेड) :** महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालय बोधडी बु च्या वतीने गावात स्वच्छता मोहीम ठिकठिकाणी राबविण्यात आली. मार्केटमध्ये केळे विक्रेता असलेली श्रीमती सुमन रुकाजी लाखाडे, ही महिला आपल्या आजूबाजूचा परिसर दररोज स्वतः स्वच्छ करते, स्वच्छता मोहिमेचे ओचित्य साधून त्या महिलेचे शाल, श्रीफळ देऊन त्यांना स्वच्छता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. व गावातील काही अंगणवाडी का सेविका ताटेताई. पाटील ताई, पांढरे ताई, दत्ता शहाणे ,मधुकर गवले, यांना स्वच्छता प्रमाणपत्र देण्यात आले. स्वच्छता मोहिमेत गावचे उपसरपंच सुनील लक्ष्मण घुगे, ग्रा . पंचायत सदस्य पागोजी तोरकड, शंकर खरोडे, संदीप सावंत व ग्राम पंचायत सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

## नळपाडा येथे सुरू होणार सुपर स्पेशालिटी सरकारी कॅशलेस हॉस्पीटल

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०२ ठाणे :** घोडबंदर येथील नळपाडा येथे १५० खाटांचे सुपर स्पेशालिटी 'मातोश्री इंदिराबाई बाबूराव सरनाईक' कॅशलेस रूग्णालयाची उभारणी आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून करण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. ठाणेकरांचे सर्व वैद्यकीय उपचार व मोठ्या शस्त्रक्रिया सरकारी योजनेतून मोफत केल्या जाव्यात यासाठी यासाठी या हॉस्पीटलची निर्मिती केली आहे. ठाणे महापालिकेने या रुग्णालयाच्या इमारतीची उभारणी केली आहे. या हॉस्पीटलमध्ये सर्व आधुनिक मशिनरी व हॉस्पीटल सुरु करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्र्यांकडून आमदार सरनाईक यांनी २५ कोटींचा विशेष निधी मंजूर करून आणला आहे.

ओवळा माजिवडा मतदारसंघातील लोकमान्य नगर, वर्तकनगर, भीमनगर, शिवाई नगर, उपवन, येऊर येथील आदिवासी पाडे, वसंत विहार, घोडबंदर रोड व आजूबाजूच्या परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना या कॅशलेस रुग्णालयाचा फायदा घेता येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेची ज्यांना माहिती आहे. अशा संस्थेला या हॉस्पीटलचे व्यवस्थापन देण्यात आले असून सर्व स्टाफ व हॉस्पीटलचे व्यवस्थापन ही संस्था सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सांभाळणार आहे. लाखो रुपये लागणा-या शस्त्रक्रिया या ठिकाणी मोफत होणार आहेत. गरजूंना औषधेही मोफत मिळणार आहेत. ठाणेकरांसाठी हे हॉस्पीटल भविष्यात वरदान ठरेल असा आशावाद सर्वसामान्यांना वाटत आहे.

## ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२४ विविध कार्यक्रमांनी होणार साजरा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०३, धाराशिव :** शहरातील बाळासाहेब ठाकरे नगर येथे ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२४ चे दि.३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



विशेष म्हणजे देवी प्रतिष्ठापना ते मिरवणुकीपर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन व नियोजनची जबाबदारी महिलांकडे सोपविण्यात आली असून खऱ्या अर्थाने महिला शक्तीचा सन्मान केला आहे. दि.३ ऑक्टोबर रोजी येडेश्वरी मंदिरातून देवीची पायी ज्योत आणण्यात येणार आहे. दरम्यान बुधवार २ ऑक्टोंबर रोजी साडेतीन शक्तीपीठातून आणलेले आदिशक्ती आदिमाया देवींच्या चरणीचे कुंकूरुपी आशीर्वाद कुंकू व घटस्थापनेसाठीचे वाण घरोघरी वाटप करण्यात आले. नवरात्र महोत्सवातील कार्यक्रमाचा देवीभक्तांसह सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ठाकरे नगर नवरात्र महोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रमुख प्रशांत साळुंके यांनी केले आहे.

धाराशिव शहरातील बाळासाहेब ठाकरे नगर येथे गेल्या २२ वर्षांपासून नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून यंदा हे २३ वे वर्ष आहे. या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रम राबविले जात असल्यामुळे सर्व सम ाजातील नागरिक यामध्ये स्वतःहून सहभाग नोंदवीत आहेत.

या नवरात्र महोत्सवाच्या आधारस्तंभ शामल साळुंके तर अध्यक्षा म्हणून सुरेखाताई खांडेकर, उपाध्यक्षा सत्यशीला गायकवाड, सचिव प्रतिभा गाडे तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून लता इंगळे, श्रद्धा उगलमोगले यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर रांगोळी प्रमुख शिवानी कोळी व योगिता निलंगे तसेच आरतीचे नियोजन कोमल कदम व वर्षा डोके यांच्याकडे तर भोगी प्रमुख म्हणून मीनाक्षी महामुनी व मंगल सलगर, स्पर्धाप्रमुख म्हणून निकिता सिरसट व दिपाली चौधरी तसेच देवी आणण्याचे नियोजन रेखा शिंदे व दिपाली गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. महाप्रसादाचे नियोजन रुक्मिणी सुर्यवंशी, सुरेखा पवार, अनारकली शिंदे व सत्यभामा खोत तसेच होम विधीचे नियोजन शितल कसपटे व इंदू जगताप यांच्याकडे तसेच दांडिया प्रमुख म्हणून लता राठोड, शुभांगी काळे व राणीताई काळे यांच्याकडे तर आराधी गीत प्रमुख म्हणून अनिताताई शेंडगे व विमल साठे तर कुंकूमार्चनचे नियोजन योजनाबाई सलगर, अर्चना सोनटक्के व पूजा वाघम ारे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

**मुलांसाठी स्पर्धा, दांडियाचेही आयोजन...**

महोत्सव काळात लहान मुलांसाठी रंगसंगती स्पर्धा घेण्यात येणार आहे. तसेच गुरुवार, १० ऑक्टोंबर रोजी मुक्त दांडियाचेही आयोजन करण्यात आले आहे. दांडियामधील विजेत्यांना बक्षीस देण्यात येणार असून प्रतिव्यक्ती १०० रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमांचे सर्व नियोजन महिलांकडे देऊन खऱ्या अर्थाने महिला सशक्तिकरण करण्याचे काम या उत्सव मंडळाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे.

**देवी मंडपात आराध्यांची गाणी...**

घटस्थापनेपासून दररोज देवी मंडपामध्ये सायंकाळी देवींची आराधी गाणी सादर केली जाणार आहेत. यामध्ये गुरुवार दि.३ ऑक्टोबर रोजी आराधी गाणी, शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी पोपट खिल्लारे, शनिवार दि.५ ऑक्टोबर रोजी चांदनाबाई कांबळे, रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी दादा माळी (अंबेजवळगे), सोमवार दि.७ ऑक्टोबर रोजी किशोर धुत (बीड), मंगळवार दि.८ ऑक्टोबर रोजी सांजा येथील आराधी मंडळ, बुधवार दि.९ ऑक्टोबर रोजी बोंदर (उत्तमी कायापुर), गुरुवार दि.१० ऑक्टोबर रोजी साखरबाई टेकाळे व विष्णू देडे तर शुक्रवार दि.११ ऑक्टोबर रोजी वैराग येथील आराधी मंडळ तसेच शनिवार दि.१२ ऑक्टोबर रोजी होम विधीनंतर दसरा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

## आदर्श विद्यालयाच्या खेळाडूंचे विविध क्रीडा स्पर्धेत यश

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा व राजेंद्र विद्यालय खंडाळा यांचे संयुक्त विद्यमाने खंडाळा तालुका स्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा नुकत्याच खंडाळा येथे संप्पन झाल्या.



या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात दक्ष लक्ष्मण जाधव या खेळाडूने ४४ किलोखालील वजन गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळवला.त्याची जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा परिषद सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा व आदर्श विद्यालय शिरवळ यांचे संयुक्त विद्यम ाने आयोजित तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत आदर्श विद्यालय शिरवळच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रविण्य मिळवले. १४ वर्षाखालील मुली गटात भाविका भरत जाधव, श्रावणी गुरवे, हेमारांनी निगडे, १७ वर्षाखालील मुलांच्या गटात गौरव पाटील, १७ वर्षाखालील मुलींच्या गटात भक्ती जाधव या खेळाडूंनी प्राविण्य मिळवले.

या सर्व खेळाडूंची सातारा येथे होणाऱ्या जिल्हा स्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी खंडाळा तालुका बुद्धिबळ संघात निवड झाली आहे. यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक चंद्रकांत भोईटे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अप्पासाहेब देशमुख, सातारा जिल्हा परिषद माजी अध्यक्ष उदय कबुले, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र तांबे, सरपंच रविराज दुधगावकर, प्रभारी मुख्याध्यपिका प्रमिला कदम, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी पालक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुदखेड मूकबधिर विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील कृष्णा नगर भागात असलेल्या अंकुर शिक्षण संस्था संचलित निवासी मूक बधिर विद्यालयात स्वर्गीय सुंदराबाई रामराव गायकवाड यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. साहेबराव गायकवाड यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी पत्रकार संजय कोलते सेवानिवृत्त सहशिक्षक बी.एस.कोलते, निवासी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत गवलवाड, पत्रकार सिद्धार्थ चौदंते, साहेबराव गागलवाड, बालाजी गऊळकर, गणेश बामणे, बालाजी सूर्यवंशी, साई प्रभू गायकवाड यांची उपस्थिती होती.

## भव्य ४० बाय ८० फूट चित्रांद्वारे महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना मानवंदना

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०२, खडकवासला (पुणे) :** देशाच्या जडणघडणीमध्ये मोठे योगदान देणा-या राष्ट्रपुरुषांना न-हे येथील जाधवर ग्रुप इन्स्टिटयूट तर्फे अनोखी मानवंदना देण्यात आली.




राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्ताने ४० बाय ८० फूट आकारातील भव्य चित्रांद्वारे तब्बल २०० विद्यार्थ्यांनी या राष्ट्रपुरुषांना म ानवंदना दिली. या अनोख्या उपक्रमात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची रेखाचित्रे देखील विद्यार्थ्यांनी काढली. संस्थेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात २० बाय ४० फूट आकारातील दोन भव्य चित्रे काढण्यात आली होती.

याकरिता मागील एका आठवडयापासून २०० विद्यार्थी तयारी करीत होते. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी याकरिता विशेष मार्गदर्शन केले. ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने वेगळा उपक्रम व्हावा, या संकल्पनेतून उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ४० बाय ८० फूट आकारात दोन भव्य चित्रे साकारण्याकरिता त्या चित्राचे वेगवेगळे प्रत्येकी ५० भाग करण्यात आले आणि नंतर ते एकमेकांना जोडण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात या राष्ट्रपुरुषांनी केलेले कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचावे, याकरिता हा उपक्रम राबविण्यात आला. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटतर्फे सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.

## मनसेच्या वैभवी जानवळकर यांची जानवळे ग्रामपंचायत उपसरपंच पदी निवड

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०३, गुहागर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुहागर तालुक्यातील जानवळे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वैभवी विनोद जानवळकर यांची बिनविरोध निवड झाली असून, सदर उपसरपंच निवडणूक प्रक्रिया ग्रामपंचायत जानवळे येथे ग्राम पंचायत सरपंच जान्हवी विखारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



उपसरपंच वैभवी जानवळकर यांच्या उपसरपंच निवडीनंतर कार्यकर्त्यांनी मनसे जल्लोष केला, ग्राम पंचायत कार्यालय ते श्री साई मंदिर, शृंगारतळी बाजारपेठ तसेच संपूर्ण गावात, त्यांच्या निवासस्थानापर्यंत ढोल ताशांच्या व फटाक्यांच्या आतिषबाजित भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकी दरम्यान गावातील नागरिकांनी वैभवी यांचे स्वागत व सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर,जिल्हाध्यक्ष संतोष नलावडे, जिल्हा सचिव सचिन गायकवाड, गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी, गुहागर तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर, सहसंपर्क अध्यक्ष समीर जोयशी, त्याचप्रमाणे तालुक्यातील सर्व मनसे सैनिक महिला आघाडी व जानवळे गावातील नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

